# 4 मार्च

**आजचा सुविचार :**

आत्मविश्वास हे वीरत्वाचे सार आहे.

**आजचे पंचांग :**

वार – शुक्रवार
दिनांक : 4 मार्च 2022
मास – फाल्गुन
नक्षत्र – उ. भाद्रपदा
सुर्योदय – सकाळी 6.49 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 6. 41 वाजता

**आजचे दिनविशेष :**

राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षा दिवस.

1980 ला भारतीय टेनिस प्लेयर रोहन बोपन्ना यांचा जन्म.

2009 ला राजस्थान च्या पोखरणाला भारताच्या ब्रह्मोस नावाच्या क्षेपणास्त्राची चाचणी केल्या गेली.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) image – प्रतिमा 2) income - उत्पन्न

3) Indian – भारतीय 4) important – महत्वाचे

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) आपला ग्रह कोणता?

2) थंडीपासून बचाव करण्यासाठी आपण कोणत्या प्रकारची कपडे वापरतो?

3) पाण्यामध्ये विरघळणाऱ्या पदार्थांची नावे सांगा.

4) पाण्याचे रेणूसूत्र काय आहे?

**बोधकथा :**

## स्फटिकाचा चेंडू

नासिरला त्याच्या बागेच्या वडाच्या झाडामागे एक स्फटिकाचा चेंडू सापडला. जेंव्हा झाडाने त्याला सांगितले की हा चेंडू तुझी मनोकामना पूर्ण करेल तेंव्हा नसीरने खूप विचार केला पण त्याला काय मागावं हे सुचलं नाही. त्यामुले त्याने तो स्फटिकाचा चेंडू पिशवीत ठेवला, आणि मनोकामना सुचण्याचे वाट बघण्याचे ठरवले. दिवसामागून दिवस गेले पण त्याने मनातली इच्छा मागितली नाही, पण त्याच्या एका चांगल्या मित्राने नासिरला स्फटीकच्या चेंडूकडे पाहताना पाहिलं. त्याने तो नासिरकडून चोरला आणि गावातल्या सगळ्यांना दाखवला. त्या सगळ्यांनी सोने आणि राजवाडे मागितले. पण प्रत्येकजण एकच इच्छा मागू शकत होता.

आता सगळ्यांकडे सोने आणि अलिशान राजवाडे याव्यतिरिक्त काहीही नव्हतं. सगळेजण उदास झाले आणि त्यांनी नासिरकडे मदत मागायचे ठरवले.

नासिरने मनोकामना व्यक्त केली की, गावकर्यांनी लोभीपणापायी जे गमावलं ते पूर्ववत होऊ दे, राजमहाल आणि सोने गायब झाले आणि सगळे गावकरी आधीसारखेच आनंदी आणि समाधानी झाले.

**तात्पर्य** – पैसे आणि संपत्ती मधून आनंद मिळत नाही.